Kvisoft PDF Merger DEMO : Purchase from www.kvisoft.com to remove the watermark

# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित राज्य विद्यापीठ)

**आस्थापना विभाग**

**एम.आय.डी.सी.रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५**

**फोन नंबर ०७१३२-२१६५९२**

जावक क्रमांक : गों.वि./आस्था/१९६९/२०१६

दिनांक :- ०९.०८.२०१६

## परिपत्रक

विषय :- मा. राज्य माहिती आयुक्त, कोकण खंडपीठ, नवी मुंबई यांनी दिलेले निर्देश श्री. सुशिलकुमार जहांगिर पावरा जि. प. शाळा आवाशी ता. दापोली यांनी दाखल केलेले द्वितीय अपील.

संदर्भ :- १) शासन पत्र क्रमांक संकीर्ण २०१६/प्र.क्र.२०४/मशि-५, दि. १५ जुलै २०१६

२) मा. वरिष्ठ प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय(उच्च शिक्षण), पुणे यांचे पत्र क्र.युएनआय /(६७/१६)/अधी.३/विशि-१/८७०९, दि. २१/०७/२०१६

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयांना कळविण्यात येते की, विद्यापीठास सदंर्भीय पत्र प्राप्त झाले असून मा. राज्य माहिती आयुक्त, कोकण खंडपीठ, कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडे दाखल झालेल्या द्वितीय अपील क्रमांक केआर ७७/२०१४ मधील तक्रार ६८/२०१५ या अपीलाच्या सुनावणी दरम्यान मा. राज्य माहिती आयुक्त यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(८)(a)(iv) अन्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागास दिनांक २/११/२०१५ रोजी निर्देश देण्यात आलेले आहे.

संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने आपल्या स्तरावर माहितीचे अवलोकन करुन कार्यवाही घ्यावी,

(डॉ. विनायक ईरपाते)
कुलसचिव
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१) सर्व विभागप्रमुख, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) विद्यापीठ अधिनस्त सर्व महाविद्यालय,

F:\BBDD\LATTER\Circular/152

महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय
मध्यवर्ती इमारत, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.
www.dhepune.gov.in E-mail- vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९,२६१२४६३९,२६०५१५१२ फॅक्स ०२०/२६१११११५३

क्रमांक-युएनआय/(६७/१६)/अधी.३/विशि-१/८७०९. दिनांक- जुलै, २०१६
21 JUL 2016

प्रति,

१.विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण
सर्व विभाग.

२.कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे.

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली
आस्थापना विभाग
आवक क्र. 2098 दि. 1/8/16
जावक क्र. ...... दि. ......

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
कुलसचिवांचे कार्यालय
आवक क्र. 640 दि. 29/7/16
जावक क्र. 3829 दि. 1/8/16

विषय- मा. राज्य माहिती आयुक्त कोकण खंडपीठ नवी मुंबई यांनी दिलेले निर्देश श्री सुशिलकुमार जहांगीर पावरा जि.प शाळा आवाशी ता दापोली यांनी दाखल केलेले व्दितीय अपील.

संदर्भ- शासनपत्र क्रमांक संकीर्ण२०१६/प्र.क्र.२०४/मशि-५
दिनांक १५ जुलै, २०१६

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भिय पत्र व सहपत्रे सोबत जोडली आहेत, कृपया अवलोकनी घ्यावीत.

वरील संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात येते की, मा.राज्य माहिती आयुक्त कोकण खडपीठ कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडे दाखल झालेल्या व्दितीय अपील क्रमांक केआर ७७/२०१४ मधील तक्रार ६८/२०१५ या अपीलाच्या सुनावणी दरम्यान मा.राज्य माहिती आयुक्त यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(८)(a)(iv) अन्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागास दिनांक २.११.२०१५ रोजी पुढीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

शालेय शिक्षण व क्रिडा विभाग व उच्च व तंत्र शिक्षण विभागाने उमेदवारांच्या प्रमाणपत्राची तपासणी करण्याकरिता सध्याची पध्दत बदलून, प्राधिकरणाने मूळ प्रमाणपत्रे घेण्याऐवजी त्याच्या Scanned कॉपी समक्ष घेऊन Scanned कॉपी संबंधित युनिर्व्हसिटी किंवा शिक्षण मंडळाकडे पडताळणीसाठी पाठविण्याबाबत विचार व्हावा.

या अनुषंगाने आपण सदर आदेशानुसार पुढील कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास व या संचालनालयास सादर करावा.

(हरिभाऊ शिंदे)
वरिष्ट प्रशासन अधिकारी
शिक्षण संचालनालय(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत- श्री बा.म.आसोले, कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन,मुंबई- ३२ यांना माहितीस्तव सादर.

शिक्षण संचालनालय
(उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-४११ ००१.
16 JUL 2016
आवक क्रमांक:- ९६२२०
शाखा:- विशि

महाराष्ट्र शासन

क्रमांक: संकीर्ण २०१६ /प्र.क्र.२०४/म.शि.५
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार,
कक्ष क्रमांक : ४१६, चौथा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई-४०० ०३२.
दुरध्वनी विस्तार क्र.३१७१.
दिनांक:- ~~०२~~ १५ जुलै, २०१६.

प्रति,
१) संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) सर्व कुलसचिव, अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

विषय:- मा.राज्य माहिती आयुक्त कोकण खंडपीठ, नवी मुंबई यांनी दिलेले निर्देश..
श्री.सुशिलकुमार जहांगीर पावरा, जि.प. शाळा, आवाशी, ता.दापोली यांनी दाखल केलेले द्वितीय अपील.

श्री.सुशिलकुमार जहांगीर पावरा, जि.प. शाळा, आवाशी, ता.दापोली यांनी मूळ गुणपत्रक व प्रमाणपत्रे गहाळ झाल्या प्रकरणी महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ, कोंकण भवन, नवी मुंबई यांचेकडे दाखल केलेले द्वितीय अपील क्रमांक : केआर ७७/२०१४ मधील तक्रार ६८/२०१५, या अपिलाच्या सुनावणी दरम्यान मा.राज्य माहिती आयुक्त, कोंकण खंडपीठ यांचे, महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (८) (अ) (iv) अन्वये, उच्च व तंत्र शिक्षण विभागास दिनांक ०२/११/२०१५ रोजी पुढीलप्रमाणे निर्देश प्राप्त झाले आहेत. (प्रत सोबत जोडली आहे.)

"शालेय शिक्षण व क्रिडा विभाग व उच्च व तंत्र शिक्षण विभागाने उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची तपासणी करण्याकरीता सध्याची पध्दत बदलून, प्राधिकरणाने मूळ प्रमाणपत्रे घेण्याऐवजी त्याच्या Scanned कॉपी समक्ष घेवून Scanned कॉपी संबंधित युनिव्हर्सिटी किंवा शिक्षण मंडळाकडे पडताळणीसाठी पाठविण्याबाबत विचार व्हावा."

२. यासंदर्भात आपणास सूचित करण्यात येते की, सदर आदेशानुसार पुढील कार्यवाही करावी व आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व संबंधित कार्यालयाच्या निदर्शनास सदर बाब आणावी. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल पाठविण्यात यावा.

(बा.म.आसोले)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

सहपत्र: वरीलप्रमाणे

प्रत:
कार्यासन/म.शि. ५, संग्रहार्थ.

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ
## कोंकण भवन, नवी मुंबई -४०० ६१४.

दूरध्वनी/फॅक्स क्रमांक : ०२२ २७५७९४६३. : Email ID : ic.konkan@maharashtra.gov.in

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल.
## अपिल क्रमांक : केआर-७७/२०१४ मधील तक्रार क्र.६८/२०१५

श्री. सुशिलकुमार जहांगीर पावरा,
जि. प. शाळा, आवाशी,
कुंभारवाडी, पो. टांगर
ता. दापोली , जि. रत्नागिरी ४१५ ७१२. ... अपिलार्थी

विरुध्द

माहिती अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (शिक्षण),
पंचायत समिती दापोली,
ता. दापोली, जि. रत्नागिरी ४१५ ७१२. ... प्रतिवादी

प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा,
गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती दापोली,
ता. दापोली, जि. रत्नागिरी ४१५ ७१२.

### विवेचन

| | |
|---|---|
| महितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक - | : ७/८/२०१३ |
| जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या उत्तराचा दिनांक - | : २१/९/२०१३ |
| प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक - | : ५/१०/२०१३ |
| प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाचा दिनांक - | : २१/११/२०१३ |
| व्दितीय अपिल प्राप्त झाल्याचा दिनांक - | : ४/१/२०१४ |
| व्दितीय अपिलाच्या सुनावणीची सूचना दिल्याचा दिनांक - | : ११/१२/२०१४ |
| व्दितीय अपिलाच्या सुनावणीचा दिनांक - | : १२/१/२०१५ |

सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्रीमती. सविता रमेशराव तोटावार, शिक्षण विस्तार अधिकारी, पंचायत समिती, दापोली तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री. जे.जे खोत, गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती दापोली उपस्थित आहेत.

**अपिलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचा तपशिल**

अपिलार्थी श्री.सुशिलकुमार पावरा यांचे मुळ गुणपत्रक व प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्यासाठी कार्यालयाकडून करण्यात आलेले प्रयत्न, श्रीमती पिंगला रावताळे, श्री.तडवी, श्रीमती तळपे यांचा कायम वेतनश्रेणीचा फरक न काढल्याचे कारण, ऑक्टोबर-२०१२ ते दिनांक ७/८/२०१३ या कालवधीत किती शिक्षकांचा वेतनश्रेणीचा फरक काढण्यात आला व फरकबील मंजूर करण्यात आले त्या आदेशाचा क्रमांक व दिनांक मिळवा.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर**

दिनांक २१/९/२०१३ च्या पत्रान्वये माहिती दिलेली आहे.

**प्रथम अपिल दाखल करण्याबाबतची कारणे**

मुद्दा क्र. १ची चुकीची व मुद्दा ३ ची असमाधानकारक व अपूर्ण माहिती दिली आहे.

**प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय**

जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिलेली असल्याने अपिल अमान्य करण्यात येत आहे.

**व्दितीय अपिल दाखल करण्याबाबतची कारणे**

[illegible]

जाप... २) ...१५ अप...

११

...विणीचा तपशील

अपिलकर्ता यांनी सुनावणी दरम्यान खालील प्रमाणे युक्तीवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने दि. २१/९/२०१३ रोजी माहिती दिली. माहिती अर्जातील मुद्दा क्र. २ ची माहिती योग्य देण्यात आलेली आहे. ...त्र मुद्दा क. १ व ३ ची चुकीची माहिती दिलेली आहे. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपिलार्थीस नोटीस न देता प्रथम अपिलावर निर्णय दिलेला आहे. ...हिती अर्जानुसार स्वतःचे डीएड चे गुणपत्रक मागितलेले आहे. तत्कालिन गटशिक्षणाधिकारी श्री. एन.के.शिंदे, यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने धमकावले ...आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान खालील प्रमाणे युक्तीवाद केला.

अपिलार्थीस दि. २१/९/२०१३ च्या पत्रान्वये माहिती दिलेली आहे. माहिती अर्जातील मुद्दा क्र १ येथील अपिलार्थी यांचे गुणपत्रक जिल्हा परिषदेकडे पडताळणीकरीता पाठविण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांच्या वेतन फरकाच्या देयका संदर्भातील माहिती सोबत आणलेली आहे. ती अपिलार्थीस पुरविण्यात येईल.

वरील वस्तुस्थिती विचारात घेवून खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

<u>निर्णय</u>

१) अपिल मान्य करण्यात येत आहे.

२) जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती अर्जातील मुद्दा क्र. १ व ३ ची माहिती १५ दिवसात नोंदणीकृत टपालाने विनामुल्य पुरवावी तसेच, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे गुणपत्रक मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांचेकडून प्राप्त करुन घेऊन १ महिन्यात अपिलार्थीस परत करावे व यासंदर्भात अपिलार्थीची पोहच प्राप्त करुन त्याची प्रत आयोगाला सादर करावी.

३) अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थीस श्री. एन.के.शिंदे, गटशिक्षणाधिकारी यांनी धमकावल्या प्रकरणी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी यांनी चौकशी करुन १ महिन्यात अहवाल आयोगास सादर करावा.

(थॅक्सी फ्रान्सिस थेकेकरा)
राज्य माहिती आयुक्त,
कोकण खंडपीठ

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : १२ जानेवारी, २०१५.
प्रत, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रत्नागिरी, जिल्हा रत्नागिरी.

<u>विवेचन</u>

दिनांक दि. १४.१०.२०१५ च्या पत्रान्वये दिनांक २.११.२०१५ च्या सुनावणीची सुचना पाठविण्यात आली आहे.

सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी श्री. एस. डी. भोसले, शिक्षण विस्तार अधिकारी, प्र... करंजाणी, ता. दापोली, सहायक जन माहिती अधिकारी श्री. टी. एम. पवार, अधिक्षक, पंचायत समिती दापोली तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी श्री. जे. जे. खोत, गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती दापोली उपस्थित आहेत.

सुनावणीचा तपशील :

अपिलकर्ता यांनी सुनावणी दरम्यान खालील प्रमाणे युक्तीवाद केला.

८ मूळ प्रमाणपत्रे (पदवी प्रमाणपत्रे, डी. एड, जातीचा दाखला, जात पडताळणीचा दाखला व तदअनुषंगिक इतर कागदपत्रे) परत मिळाली नाहीत. नंतर प्रमाणपत्रे आयुक्त, परिक्षा परीषद, पुणे यांचेकडे पाठविण्यात आली आहेत. अपिलार्थी यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी यांनी निलंबित केले आहे. जन माहिती अधिकारी यांना शास्ती लावावी.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान खालील प्रमाणे युक्तीवाद केला.

गुणपत्रक शिक्षण अधिकारी कार्यालय, रत्नागिरी यांचेकडे पाठविण्यात आली असून ते तेथे गहाळ झाले आहेत. पत्रव्यवहाराच्या प्रती अपिलार्थींना दुय्यम प्रती मिळविण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. वेतन फरकाच्या रकमेबाबतची माहितीसुध्दा देण्यात आलेली आहे. श्रीमती प्रेरणा देशभ्रतार या सध्या मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी अपिलार्थींना निलंबित केले आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी श्रीमती तोटावार यांना मे, २०१५ पासून सेवेतून काढून टाकण्यात आले आहे. जुलै २०१५ पासून श्री. एस. डी. भोसले हे जन माहिती अधिकारी आहेत. श्री. टी. एम. पवार हे सहायक जन माहिती अधिकारी आहेत. अपिलार्थी यांची मूळ कागदपत्रे परत मिळविण्याचे संदर्भात प्रयत्न सुरु असल्याचे श्री. पवार यांनी सांगितले.

वरील वस्तुस्थिती विचारात घेवून खालीलप्रमाणे निर्णय देण्यात येत आहे.

## आदेश

१. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या आदेशानंतरसुध्दा माहिती दिली नाही. अपिलार्थी यांची मूळ कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांनी हरवली आहेत. जन माहिती अधिकारी यांनी ३ महिन्यामध्ये हरविलेल्या ८ मूळ प्रमाणपत्रांची दुय्यम प्रती (Duplicate) प्राप्त करुन अपिलार्थीस द्याव्यात.

२. अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अर्जान्वये केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने श्रीमती प्रेरणा देशभ्रतार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी यांनी अपिलार्थी यांना निलंबित केले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी यांनी आयोगाच्या आदेशानुसार चौकशी करुन अहवाल सादर केलेला नाही.

३. अपिलार्थींना माहिती मिळविण्यासाठी जो त्रास सहन करावा लागला त्याची भरपाई म्हणून जिल्हा परिषद रत्नागिरी यांच्या प्राधिकरणाव्दारे, महितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९ (८) (ख) खालील तरतुदीनुसार अपिलार्थी श्री. सुशीलकुमार पावरा यांना रुपये २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख मात्र) इतकी भरपाई मंजुर करण्यांत येत आहे. सदर रक्कम प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी कार्यालयीन खर्चाच्या अर्थसंकल्पीय आर्थिक तरतुदींतुन अपिलार्थीस चेकव्दारे, पोष्टाने अदा करावी व कार्यपुर्ती अहवाल आयोगास सादर करावा.

४. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (८) (a) अन्वये श्री. तानाजी सत्रे, विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

अ) जन माहिती अधिकारी यांनी विशेष अधिकारी नेमून अपिलार्थींची मूळ कागदपत्रे ज्या ज्या अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आली आहेत त्या अधिकाऱ्यांकडे शोध घेवून १ महिन्याच्या आत मूळ कागदपत्रे शोधून ती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात येतील याबाबत विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांनी खातरजमा करावी.

ब) श्री. एन. के. शिंदे, गट शिक्षण अधिकारी यांनी अपिलार्थींनी माहिती अधिकार अंतर्गत अर्ज दाखल केल्यामुळे हल्ला केल्याच्या प्रकरणी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद रत्नागिरी यांचेकडून १ महिन्याच्या आत अहवाल मागवून आयोगास सादर करावा.

क) आयोगाच्या दिनांक १२.१.२०१५ रोजीच्या आदेशाचे अनुपालन न केल्यामुळे श्रीमती देशभ्रतार यांचा खुलासा त्यांच्याकडून १ महिन्यात मागवून आयोगाला सादर करावा व त्याबाबतचा अहवाल त्यांच्याकडून आदेशाच्या दिनांकापासून ३ महिन्याच्या आत आयोगाला सादर करावा.

महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (८) (a) (iv) अन्वये सचिव शालेय शिक्षण विभाग व उच्च तंत्र शिक्षण विभाग यांना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

शालेय शिक्षण व क्रिडा विभाग व उच्च व तंत्र शिक्षण विभागाने उमेदवारांच्या प्रमाणपत्रांची तपासणी करण्याकरीता सध्याची पध्दत बदलून, प्राधिकरणाने मूळ प्रमाणपत्रे घेण्याऐवजी त्याच्या Scanned कॉपी समक्ष घेवून Scanned कॉपी संबंधित युनिव्हर्सिटी किंवा शिक्षण मंडळाकडे पडताळणीसाठी पाठविण्याबाबत विचार करावा.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २ नोव्हेंबर, २०१५.

टी. एफ. थेकेकरा

(थँक्सी फ्रान्सिस थेकेकरा)
राज्य माहिती आयुक्त,
कोंकण खंडपीठ

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना,

१) श्री. नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२) श्री. संजय चहांदे, प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३) श्री. तानाजी सत्रे, विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद रत्नागिरी, ता. जि. रत्नागिरी.